// सा विद्या या विमुक्तये //

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड—४३१ ६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)

Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325

Website : srtmun.ac.in
e-mail : affi.srtmun@gmail.com

प्रक्रिया शुल्क (Processing Fees) त्याच शैक्षणिक वर्षात परत करणे बाबत.

## :: परिपत्रक ::

संदर्भ :— मा. व्यवस्थापन परिषद बैठक, विषय क्र. ०७/५९—२०१९, दि. १४.०३.२०१९.

प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या संस्थेच्या अध्यक्ष व सचिव व संलग्नीत असलेले महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने वर्षनिहाय प्रसिध्द केलेल्या बृहत आराखडयानुसार संस्था/महाविद्यालये ही नवीन महाविद्यालय/ नवीन विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/नवीन तुकडी इत्यादी बाबतचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करतात. यातील कांही प्रस्तावात त्रुटी असल्यामुळे तें प्रस्ताव विद्यापीठस्तरावर नाकारण्यात येतात. नाकारलेल्या प्रस्तावांचे प्रक्रिया शुल्क (**Process Fees**) हे संबंधित संस्थेस/ महाविद्यालयास विद्यापीठाच्या नियमानुसार परत केले जाते.

परंतु, सदर शुल्क परत करणेसाठी संबंधित संस्थेस/महाविद्यालयास विद्यापीठास अर्ज करुन अर्जासोबत प्रक्रिया शुल्क सादर केल्याची मुळ पावती सोबत जोडून ते परत मागावे लागते. कांही संस्था तर ब—याच वर्षापासूनचे जुन्या कालावधीतीले शुल्क परत करणेबाबत पत्रव्यवहार करतात. सदर कार्यवाही करतांना याबाबतचे जुने दस्तावेज शोधण्याचे काम करतांना याबाबत विलंब होतो.

याबाबत दि. १४.०३.२०१९ रोजी संपन्न झालेल्या मा. व्यवस्थापन परिषद बैठकीत विषय क्र. ०७/५८—२०१९ अन्वये पुढीलप्रमाणे ठराव मंजुर झाला आहे. विद्यापीठास सादर केलेल्या नवीन महाविद्यालय/नवीन विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/नवीन तुकडी इत्यादी बाबतचे प्रस्ताव विद्यापीठस्तरावर नाकारल्यास विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या प्रक्रिया शुल्काच्या रक्कमेतून ४० टक्के रकम कपात करण्यात यावी ती रक्कम विद्यापीठाकडेच ठेवण्यात यावी व उर्वरित ६० टक्के रक्कम पूर्व कागदपत्राची प्रक्रिया करुन त्याच शैक्षणिक वर्षात महाविद्यालया परत करण्यात यावी, तसेच याची माहिती संबंधित संस्थेस कळविण्यात यावी.

या परिपत्रकाद्वारे मा. व्यवस्थापन परिषदेने संदर्भिय बैठकीत घेतलेला निर्णयानुसार सदरची कार्यवाही ही ३०.०९.२०१९ पर्यंत सादर होणा—या २०२०—२०२१ च्या प्रस्तावापासुन नियमीतपणे पुढे लागु राहील. तरी, याबाबतची नोंद संबंधित संस्था/महाविद्यालयातील अध्यक्ष/सचिव व प्राचार्यांनी घ्यावी.

सदरचे परिपत्रक हे विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर **affiliation** या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात आले आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर, )(
विष्णूपुरी, नांदेड—४३१६०६. )(
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न—०३/२०१८—२०१९/3476 )(
दिनांक :— ०८.०४.२०१९. )(

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :—

१. प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या संस्थांचे मा. संस्था अध्यक्ष/सचिव व प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर **affiliation** या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.

G:\Circular\Circular File.doc